**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विद्याधर केशरचंद दोशी
जीवन-तारा, १२६-मोरारजी पेठ,
सरस्वती चौक, सोलापूर-४१३००१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१७ / सोलापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.अनिल विपत

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.सुभाष सावस्कर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.४.२००७ |

| ८ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१२६/१ मोरारजी पेठ येथील अनधिकृत बांधकामाबाबत (सोबत प्रत ) |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.विद्याधर केशरचंद दोशी यांनी १२६/१ मोरारजी पेठ, सोलापूर येथील अनधिकृत बांधकामाबाबत २३ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. माहिती विलंबाने व अपूर्ण मिळाल्याच्या कारणावरुन श्री.दोशी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. श्री.दोशी यांना माहिती देण्यात आली आहे, याची खात्री करावी व काही माहिती द्यावयाची राहिली असल्यास त्वरित द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. परंतु अपिलीय प्राधिकाऱ्यांची कार्यपध्दती अपीलकर्त्याला सुनावणीची अत्यल्प वेळाची सूचना देणारी असून त्यांचा निर्णय असंबध्द व अर्थबोध न होणारा आहे. माहिती १७४ दिवस विलंबाने मिळाली आहे. जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावावी व अपिलीय प्राधिकाऱ्यांना समज द्यावी, अशी मागणी श्री.दोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात केली आहे.

दि.१७.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार होऊन निर्णय व्हावा, असे निवेदन देऊन वैयक्तिक कारणास्तव ते अनुपस्थित होते.

श्री.दोशी यानी नमूद केलेला तपशील पुढीलप्रमाणे :

माहिती मागणीसाठीचा दि.२२.९.२००६ ही तारीख असलेला अर्ज आपण प्रत्यक्ष दि.२५.९.२००६ रोजी दाखल केला. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती घेऊन जाण्याबाबत दि.२०.१०.२००६ रोजी कळविले. ते पत्र दि.२.११.२००६ रोजी मिळाले. माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ अन्वये विहित ३० दिवसांच्या मुदतीपेक्षा उशिरा पत्र मिळाले असल्यामुळे नियमानुसार माहिती नि:शुल्क मिळावी, असे पत्र दि.२.११.२००६ रोजी आपण समक्ष दिले. दिलेल्या माहितीत नकाशाची एक प्रत व कॅल्हेटची प्रत मिळाली. ही अपुरी माहिती असल्याचे पत्र आपण त्याच दिवशी दि.१७.११.२००६ रोजी पाठविले. तरीही माहिती न मिळाल्यामुळे दि.२९.११.२००६ रोजी (दाखल दि.१.१२.२००६) अपील केले. दोन वेळा सुनावणीच्या फक्त १९ तास आधी सुनावणीचे पत्र मिळाले. दि.४.४.२००७ रोजी लेखी म्हणणे सादर केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.५.४.२००७ रोजी निर्णय दिला. त्याबाबत दि.१३.४.२००७ रोजी पुन्हा आपण निवेदन सादर केले. त्यानंतर त्यांच्या आदेशानुसार दि.१७.४.२००७ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती पाठविली, म्हणजेच १७४ दिवस विलंबाने माहिती दिली.

श्री.दोशी यांना दि.२०.१०.२००६ च्या पत्रान्वये माहिती देण्यात आली आहे. अपिलाच्या निर्णयानंतर पुन्हा दि.१७.४.२००७ रोजी माहिती देण्यात आली. माहिती नि:शुल्क दिली. श्री.विद्याधर केशरचंद दोशी व श्रीमती विद्या प्रकाश खामीतकर यांच्यामध्ये मालक-भाडेकरु असा वाद असून त्या संदर्भात १९६६ पासूनची माहिती श्री.दोशी यांनी मागितली होती. श्रीमती खामीतकर यांच्याविरुध्द कारवाई करण्याची श्री.दोशी यांची मूळ मागणी असून त्या संदर्भातील दावा सोलापूर येथील जिल्हा न्यायालयात दाखल असून न्यायालयाने दि.३०७.२००७ रोजी स्थगिती आदेश दिलेले आहेत. त्यामुळे श्री.दोशी यांना अपेक्षित असलेली उपाययोजना करता आलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता श्री.सुभाष सावस्कर यांनी दि.२९.१२.२००७ च्या निवेदनाद्वारे आयोगाला कळविले होते. त्याचाच पुनरुच्चार त्यांनी सुनावणीत केला. 'या प्रकरणी विहित मुदतीत माहिती देण्याच्या सूचना संबंधित कनिष्ठ अभियंता श्री.एम.एन.क्षीरसागर यांनाही देण्यात आल्या होत्या. विहित मुदतीत प्रकरणे निकाली काढण्यास त्यांनी विलंब लावलेला असल्याने शास्तीचा विचार झाल्यास श्री.क्षीरसागर यांना जबाबदार धरण्यात यावे,' असे नगर अभियंता यांनी दि.२०.११.२००८ रेजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. श्री.क्षीरसागर यांना याबाबत दिलेल्या लेखी सूचनांच्या प्रती त्यांनी सादर केल्या. मात्र या सूचना

प्रामुख्याने प्रशासकीय कार्यवाहीशी निगडीत आहेत, असे दिसते. माहिती देण्याबाबतचा उल्लेख एका परिपत्रकाच्या स्वरुपात आहे. ही कागदपत्रे पाहता माहिती देण्यास विलंब झाला असल्यास श्री.एम.एन.क्षीरसागर, कनिष्ठ अभियंता जबाबदार ठरत नाहीत.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.दोशी यांनी अर्ज केल्यापासून ३० दिवसांच्या विहित मुदतीत त्यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्काबाबत कळविले आहे. कार्यालयीन सार्वजनिक सुट्टीमुळे पत्र पोहोचण्यास विलंब झाल्याचे व तसे श्री.दोशी याना कळविल्याचेही जन माहिती अधिकारी श्री.सुभाष सावस्कर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. श्री.दोशी यांच्या अर्जात भाष्य अथवा खुलासा मागणारे अथवा मत व्यक्त करणारे काही मुद्दे आहेत. उदा. 'क्र.१४ मध्ये 'बांधकाम परवानगी' नाही असे कळविणे व क्र.१५ नुसार नोटीस पाठविणे या बाबी अर्जदाराची दिशाभूल करीत आहात-याबाबत माहिती मिळावी,' मुद्दा क्र.१०.२०.२१ हे याच स्वरुपाचे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये दिलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत अशा बाबींचा समावेश होत नाही. मात्र सर्व मुद्दयांवर जन माहिती अधिकाऱ्यानी उत्तर दिले आहे, असे त्यानी दाखल केलेल्या दि.२०.१०.२००६ च्या पत्रावरुन दिसते. या पत्रासोबत नकाशाची प्रत व कॅव्हेटची प्रत देण्यात आल्याचे नमूद आहे. मूळ विषय पूर्णतः व्यक्तिगत स्वरुपाचा असून त्याबाबत सर्व मुद्दयांचे उत्तर विहित मुदतीत देण्यात आले असून पत्र देण्यास झालेल्या विलंबामुळे माहिती निःशुल्क देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर वेगळी माहिती दिलेली नाही, तर त्याच माहितीची प्रत पाठविण्यात आलेली आहे, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. त्यामुळे माहिती १७४ दिवस विलंबाने दिली, हा आक्षेप अमान्य करण्यात येत आहे.

अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय असंबध्द व त्यांना काय म्हणावयाचे आहे हे स्पष्ट न होणारा आहे, हे श्री.दोशी यांचे म्हणणे योग्य नाही, आदेश सुस्पष्ट आहे. मात्र अपिलीय प्राधिकारी श्री.अनिल विपत प्रत्येक वेळी एका दिवसाच्या मुदतीने अपीलकर्त्याला सुनावणीची पूर्वसूचना देतात, या तारखाही पुढे ढकलल्या जातात, हा श्री.दोशी यांचा आक्षेप रास्त असल्याचे

उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कमाल ४५ दिवसांच्या मुदतीत अपिलाचा निर्णय करणे बंधनकारक आहे. तेही पाळले जात नाही, अशी व्यक्तिशः श्री.विपत यांच्याविरुध्द श्री.दोशी यांची तक्रार आहे, ती रास्त आहे. अपीलकर्त्याला सुनावणीबाबत पुरेशा मुदतीने पूर्वसूचना दिली गेली पाहिजे व कायद्याने नमूद केलेल्या मुदतीत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निर्णय दिला पाहिजे, याची समज अपिलीय प्राधिकारी श्री.अनिल विपत यांना देण्यात येत आहे.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मिलिंद मऱ्याप्पा मुळे
होटगी स्टेशन, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर-४१३२१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सोलापूर, कंबर तलाव स्मृती उद्यान, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा रोपवन अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,
सोलापूर, कंबर तलाव स्मृती उद्यान, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२९ /सोलापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख (वि.अ.नि.का.) | दि.१९.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मिलिंद मऱ्याप्पा मुळे
होटगी स्टेशन, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर-४१३२१५

**जन माहिती अधिकारी** तथा रोपवन अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,
सोलापूर, कंबर तलाव स्मृती उद्यान, सोलापूर श्री.डी.एन.जोशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.४.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कुभारी ते वळसंग व फलाटेवाडी ते आहेरवाडी या गावांना जोडणाऱ्या रस्त्याच्या लगत रोप लागवडीसाठी संपूर्ण ग्रामीण राजगार हमी योजनेखाली शासनाने किती रक्कम मंजूर केली व मंजूर झालेली रक्कम संपूर्ण खर्च करण्यात आली का? नसेल तर किती रक्कम खर्च झाली, किती शिल्लक राहिली याबाबत मूल्यांकनासहीत साक्षांकित प्रत. या संदर्भातील दहा मुद्दयांची माहिती. |
|---|---|

## विवेचन

रोप लागवडीसाठी झालेल्या खर्चाच्या संदर्भातील ११ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी मुदतीत दिली नाही, प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही बनावट व अपुरी माहिती दिली, अपिलीय प्राधिकाऱ्यांसह संगनमताने माहिती नाकारली गेली. सत्य माहिती दिली जात नाही, म्हणून सहाय्यक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना शास्ती करावी व आपल्याला संपूर्ण माहिती द्यावी, अशा मागणीसाठी अपीलकर्ता श्री.मिलिंद मऱ्याप्पा मुळे (पत्रकार) यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१९.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपण दि.२३.१.२००७ रोजी केलेल्या अर्जावर प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर दि.२०.४.२००७ रोजी माहिती देण्यात आली. जाणीवपूर्वक खोटी व विलंबाने अशी माहिती दिली. सर्व अधिकाऱ्यांनी संगनमताने खोटी व चुकीची माहिती दिली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री.मुळे यांनी केले. माहिती देण्यास ४८० दिवस विलंब झाला असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

श्री.मुळे यानी आपला धंदा-शेती/पत्रकार असा अर्जात नोंदविला असून दारिद्र्यरेषेखाली असल्याचे नमूद केले आहे. प्रत्येक मुद्दयातील माहिती दोन प्रतींमध्ये त्यांनी मागितली आहे. तसेच दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीकडून कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही, अशी तरतूद असल्याने

सदरच्या नकला तीन प्रतीत विनामूल्य न्यायालयाच्या कामकाजाकामी तात्काळ देण्याची व्यवस्था करावी, असेही मूळ अर्जात म्हटले आहे.

'१.सहाय्यक माहिती अधिकारी २.माहिती अधिकारी ३.अपिलीय अधिकारी यांनी दिलेली माहितीही खोटी, चुकीची व बनावट, दिशाभूल करणारी आहे व त्यांनी दिलेल्या माहितीमध्ये रकाना क्र.२ मधील माहितीची पूर्तता यामध्ये १.कुंभारी ते वळसंग हद्द संपेपर्यंतचे काम हे २००५-०६ मध्ये मंजूर नाही. त्याचप्रमाणे फताटेवाडी ते आहेरवाडी हेदेखील २००५-०६ मध्ये रोपलागवडीचे काम मंजूर नाही, असे अर्जदाराच्या माहितीमध्ये दिलेले आहे. परंतु अर्जदार यांनी पुन्हा दि.१६.२.२००८ रोजी पुनश्च माहिती मिळविण्यासाठी अर्ज दिलेला होता. त्यामध्ये सहाय्यक माहिती अधिकारी व माहिती अधिकारी यांनी रजिस्टर पोस्टाद्वारे पाठविलेल्या माहितीमध्ये २००५ सालामधील माहिती दिलेली आहे. त्यामध्ये मुद्दा क्र.३ अ.क्र.१२ रस्ता दुतर्फा वनीकरण २ किलोमीटर झालेले आहे, असे नमूद आहे. त्याचप्रमाणे अ.क्र.१४ हे देखील २००५ मध्ये रस्ता दुतर्फा वनीकरण २ कि.मी.वळसंग सूत मिलपर्यंत केले असल्याचे नमूद केलेले आहे,' असे श्री.मुळे योचे वकील श्री.विजय पंडित शिंदे यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

श्री.मुळे यांच्या प्रथम अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, कंबर तलाव, स्मृती उद्यान, सोलापूर यांनी सुनावणीत दि.१९.४.२००७ पर्यंत माहिती देण्याचा आदेश दिला. त्यानुसार दि.१९.४.२००७ रोजी आपण माहिती तयार ठेवली होती, परंतु श्री.मुळे यांनी ती वाचून नाकारली. त्यानंतर स्पीड पोस्टाने आपण ती पाठविली, ती त्यांनी घेतली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.डी.एन.जोशी यांनी केले. मात्र दिलेली माहिती अपुरी, खोटी व चुकीची असल्याचे आणि संगनमताने ती तशी दिली जात असल्याच्या प्रतिपादनाचा श्री.मुळे यांनी पुनरुच्चार केला. याबाबतचे पुरावे त्यांनी सादर केलेले नाहीत.

दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर या दोन तालुक्याचे क्षेत्र आपल्या अखत्यारीत असून मागितलेली माहिती विस्तृत आहे. संबंधित काळातील शासकीय योजनांची अंमलबजावणी,

त्यासाठी दोन्ही तालुक्यातून लाभार्थ्यांची ग्रामस्थांना, शेतकऱ्यांना माहिती देऊन संमतीपत्रे/हमीपत्रे घेऊन निवड करणे इ. कामामुळे विहित मुदतीत माहिती देता आली नाही, मात्र नंतर सर्व माहिती दिली आहे. या विलंबाबाबत आपल्याला एक वेळ क्षमा करावी, अशी विनंती जन माहिती अधिकारी श्री.डी.एन.जोशी यांनी लेखी व तोंडी केली. ते क्षमा करण्यास पात्र नसल्याचे प्रतिपादन श्री.मुळे यांनी केले.

दारिद्र्यरेषेखालील अर्जदाराला माहिती निःशुल्क देण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये आहे, मात्र मागणी एकापेक्षा अनेक प्रतींमध्ये माहिती मागता येणार नाही. दोन किंवा तीन प्रतींत माहिती मागणे योग्य नाही.

जन माहिती अधिकाऱ्यांची विलंब क्षमापित करण्याची विनंती मान्य करण्यात येत आहे. मात्र कामाच्या व्यापाची सबब पुढे करुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कार्यवाहीत पुन्हा कसूर केल्यास कारवाई केली जाईल, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि३१.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४३५/ २००९/ सोलापूर | श्री. दत्तू सोपान थिटे मु. पिरटाकळी, पो. ति-हे, ता. मोहोळ, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार मोहोळ, जि. सोलापूर | तहसीलदार मोहोळ, जि. सोलापूर | श्री. उत्तम सुखदेव शिंदे यांनी श्री. दत्तू सोपान थिटे यांच्या विरोधात लोकशाही दिनात दिलेल्या तक्रार अर्जाच्या प्रमाणित प्रती. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचा अपिलकर्त्याचा जबाब अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मोहोळ यांनी दि. ६.८.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केला. |
| २ | ४३७/ २००९/ सोलापूर | श्री सूर्यकांत कृष्णा माने मु. पो ओझेवाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, श्री भैरवनाथ विद्यालय, सरकोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद सोलापूर | सन १९९० पासून प्रशालेत किती शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी देण्यात आली, १२ वर्ष पूर्ण होऊनही किती शिक्षकांना नाही, वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात आली नाही, वरिष्ठ वेतणश्रेणी न देण्याचा खुलासा इत्यादी. | आवश्यक माहिती मिळाल्याने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने दि.७.८.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले. |
| ३ | ९००/ २००९/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी श्री. दत्त रोड, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | माहिती अधिकारी, समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, सोलापूर | समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर | अपंगाना मिळणारे फायदे, सवलती याबाबतचे केंद्रशासन व राज्य शासनाचे शासन निर्णय, अपंग व्यक्तींना दिलेल्या ओळखपत्रांचा तपशील.इत्यादी | नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे, याची विचारणा अपिलकर्त्यास केली. मात्र अपीलकर्त्याने दि.११.५.२००९ रोजी अभिलेखाचे निरीक्षण करून आवश्यक माहिती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | टिकमार्क केली. परंतु सदर माहिती अपीलकर्ते घेऊन गेले नाहीत, म्हणून दि. १४.५.२००९ रोजी अपिलीय प्राधिकारी यांनी सदर माहिती पोस्टाने पाठविली, अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे.विविध स्वरूपाचे अर्ज करून अपीलकर्ता माहिती घेण्याबाबत असेच वर्तन करीत असल्याचे अनेक अपिलांमध्ये दिसून येते. याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे. |
| ४ | ९०५/ २००९/ सोलापूर | सौ. गीता किशोर उत्पात १३९८/०१, गांधी रोड, पंढरपुर, जि. सोलापूर | १) चेअरमन/ सचिव, श्री. सु. रा. परिचारिक सहकारी पतसंस्था, पंढरपूर, जि. सोलापूर २) सहायक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर, जि. सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | श्री. सु. रा. परिचारिक पतसंस्थेस देणे / थकबाकी असल्यास किती व त्यांचा खाते उतारा मिळावा. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँका, पतसंस्था यांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. |
| ५ | ९१६/ २००९/ सोलापूर | श्री. पांडुरंग आबाजी साळवे मु. पो. दहिगाव, ता. माळशिरस, जि. सोलापूर | माहिती अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, जि.सोलापूर | सन २००७ - २००८ व २००८ - २००९ साली विशेष घटक योजनेतील किती विहिरी दहिगावला मंजुर झाल्या, त्यापैकी पुर्ण किती व अपूर्ण किती, गाव कामगार | १) अपीलकर्त्याने अपिलासोबत विहित मुद्रांक शुल्क(२०/-रु.) जोडलेले नाही. २) जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस यांनी दिलेली माहिती अपूर्ण |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तलाठी यांना ७/१२ वर विहीर नोंदी धरणेसाठी दिलेल्या आदेशाची प्रत, प्रत्येक विहिरीला किती निधी मंजुर झाला व त्या पैकी किती खर्च झाला, याची माहिती. | व चुकीची कशी, हे अपीलकर्त्याने, सप्रमाण स्पष्ट केलेले नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण ५ अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र ४३५ /२००९/ सोलापूर,४३७ /२००९ / सोलापूर,९०० /२००९ /सोलापूर,९०५ /२००९/ सोलापूर, ९१६ /२००९ /सोलापूर ) निकाली काढण्यात येत आहे.

२) अपील क्र ९०५/२००९ सोलापूर मध्ये नियंत्रण अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या खात्याच्या सबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती सबंधित कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी,

पुणे

दि.२९.०८.२००८

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४३८ +९२७/ पुणे | श्री.नंदकुमार पाटीलबुवा गारगोटे मु.पो.कडूस, ता.खेड, जि.पुणे | मुख्याध्यापक, भैरवनाथ विद्यालय दोंदे, ता.खेड, पुणे | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे | १) भैरवनाथ विद्यालयामधील सन १९९८-९९ मधील अर्धवेळ पदांच्या शिक्षकांच्या याद्या, मंजूर देयकांच्या प्रती, हजेरीपट इ.माहिती २) सन १९९३-९४ मध्ये श्रीमती एम.बी.कुंभार शिक्षिका विद्यालयात होत्या का ३)सन १९९४-९५ मध्ये श्री.एम.एल. बारणे शाळेत सेवेत होते का ? इ. अनुषंगिक मुद्दे | १) अर्जदार श्री.गारगोटे एकाच प्रकारची माहिती वारंवार मागतात व मुदतीत माहिती देऊ केली असता माहिती न नेणे व अपील करणे अशी कृती ते वारंवार करतात, असे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दि.७.४.२००८ रोजी आयोगास सादर केले आहे. २) अपीलकर्ता श्री.गारगोटे यांची यापूर्वीची अपिले क्र.२००६/ ६६४ +६६६+६६७ वर दि.१४.२.२००७ रोजी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी व अपील क्र.२१, २३ व ३२/पुणे वर राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांनी दि.२३.८.२००७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रोजी पारित केलेले आदेश विचारात घेता एकाच आशयाचे माहिती मागणीचे अर्ज व अपिले वारंवार करुन सर्व यंत्रणांचा वेळ व शक्ती वाया घालवू नये, अशी सक्त समज अपीलकर्ता श्री.गारगोटे यांना देण्यात येत आहे. |
| २ | १२३०/ पुणे | श्री.रमाकांत हरी तोरणे मु.पो.बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे | ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे मेडद, ता.माळशिरस, जि.सोलापूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर | सन २००१ ते २००७ या कालावधीतील ग्रामपंचायतीने वेळोवेळी घेतलेल्या मासिक सभेतील निर्णय, उपस्थित सदस्य संख्या गावातील रस्त्यासंबंधी नकाशासह माहिती, विकास निधी खर्च इ. अनुषंगिक मुद्दे | आवश्यक माहिती २१ दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१६.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | १४४१/ पुणे | श्री.द्वितीय बन्सीलाल बोरा ४०३७, महाजन गल्ली, अहमदनगर | निवासी नायब तहसीलदार, जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर, जि.पुणे | तहसीलदार, जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर, जि.पुणे | मौजे मंगरुळ येथील अपील क्र.३२ ग/४३/८७ च्या निर्णयाची व जाब जबाबाची नक्कल मागणी | अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.३०.४.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | १५३४/ पुणे | ॲड.सुभाष सदाशिव | निवासी नायब तहसीलदार, | तहसीलदार, तहसील | शिवाजीनगर येथील स.नं.८८२-अ खाते | आवश्यक माहिती देण्यात आल्याचे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रिसबुड ८८२/अ, भांडारकर पथ, गल्ली क्र.८, पुणे -४ | तहसील कार्यालय पुणे शहर, शुक्रवार पेठ, पुणे-२ | कार्यालय पुणे शहर, शुक्रवार पेठ, पुणे-२ | नं.१२५५ या मिळकतीवरील बिगर शेतसारा वसुली व शासन निर्णय परिपत्रकाची प्रमाणित प्रत | अपीलकर्त्याच्या स्वाक्षरीसह पत्र जन माहिती अधिकारी यांनी दि.५.६.२००९ रोजी आयोगास सादर केले आहे. |
| ५ | २५५२/ पुणे | श्री.माणकचंद लक्ष्मण बाहेती हरिहर अपार्टमेंट, ७२८ ब, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे-३० | कनिष्ठ अभियंता (रोड विभाग), विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | नगर उप अभियंता (पथ), पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | रामबाग कॉलनी, हॉटेल सारस, हॉटेल पराग गार्डन सोन्या मारुती चौक इ.ठिकाणचे ड्रेनेज चेंबर्स कव्हर दुरुस्ती व रस्त्याच्या समपातळीत करणे इ. माहिती | माहिती समाधानकारक मिळालेली असल्याचे अपीलकर्ता यांनी दि.२४.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले असून दि.२५.२.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये अपील निकाली काढण्याबाबत तिन्ही घटकांमध्ये एकमत झाल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१) वरील तक्त्यातील एकूण ६ अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र. ४३८+९२७/पुणे, १२३०/पुणे, १४४१/पुणे, १५३४/पुणे व २५५२/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र.१२३०/पुणे मध्ये निष्कर्षात नमूद / आदेशित केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६ -०८-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४६०/ २००९/ सातारा | श्री. सुभाष बबनराव जेबले कसबा पेठ, पवार गल्ली, ता.फलटण, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार, मावळ, ता.मावळ, जि.पुणे | तहसीलदार, मावळ, ता.मावळ, जि.पुणे | जमीन खरेदी वेळी मूळ शेतकरी असल्याच्या दाखल्याची छायांकित प्रत | अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | ४६१/ २००९/ सातारा | श्री. कमलाकर गजानन कांबळे गजानन चौक, जुने बोर्डीग, फलटण, जि.सातारा | सरव्यवस्थापक, श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक लि.,फलटण जि.सातारा | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा | अपीलकर्त्याच्या, तसेच अन्य व्यक्तींच्या सभासदत्वा-बाबतची माहिती, कॅश/क्रेडिट कर्ज वाटपाबाबत, कर्ज खात्याबाबत तसेच आर.बी.आय. ने १९९८ पासून वेळोवेळी बदललेल्या व्याजदराबाबतची इ. एकूण १२ मुद्दयांबाबतची माहिती | १. नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. तथापि नियंत्रक अधिकारी म्हणून सहकार खात्याच्या कार्यालयांकडे जी माहिती उपलब्ध असणे आवश्यक आहे,ती संबंधित कार्यालयांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ व २ (अपील क्र.४६०/२००९ व ४६१/२००९/सातारा निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. २६.८.२००९**

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलामध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५१९/ २००९/ सातारा | श्री. शाम आबा अहिवळे १९५-अ, मंगळवार पेठ, फलटण, जि.सातारा | तालुका कृषि अधिकारी, फलटण, जि.सातारा | उपविभागीय कृषि अधिकारी, फलटण, जि.सातारा | १) सन २००७,२००८ व २००९ सालासाठी मंजूर गतिमान पाणलोट विकास योजनेसाठी प्राप्त अनुदानाबाबत व कामाच्या तांत्रिक मंजूरी आदेशांच्या सत्यप्रती व इतर चार मुद्दयांची माहिती २) सन २००७,२००८ व २००९ मध्ये मृदुसंधारण कामे केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची माहिती | १)अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. २) दोन स्वतंत्र माहिती अर्जांसाठी माहिती आयोगाकडे एकच स्वतंत्र अपील सादर करणे आवश्यक आहे. |
| २ | ५२०/ २००९/ सातारा | श्री.सिद्धार्थ नाना कांबळे मु.पो. नागठाणे, ता. व जि.सातारा | प्रमुख लिपिक, (ग्रामपंचायत शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा | सन २००५ ते २००९ या सालातील ग्रामपंचायतींच्या पदाधिका-यांच्या विरोधात दिलेल्या निर्णयाच्या निकालपत्रांच्या प्रती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ३ | ५२१/ २००९/ सातारा | श्री. शाम आबा अहिवळे १९५-अ, | तालुका कृषि अधिकारी खटाव, जि.सातारा | उपविभागीय कृषि अधिकारी, फलटण, जि.सातारा | मूळ माहिती अर्जातील मागणीबाबत तपशील अपिलात नमूद केलेला नाही. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंगळवार पेठ, फलटण, जि.सातारा | | | | जोडलेली नाहीत. |
| ४ | ५४९/ २००९/ सातारा | सौ. वैशाली किशोर लोहार मु.पो. मुरुड, ता. पाटण, जि.सातारा | उपअभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सातारा जिल्हा परिषद, सातारा | नोडल कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सातारा जिल्हा परिषद, सातारा | प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पाटण तालुक्यातील आंबळे ते घाटेवाडी रस्त्याविषयीची एकूण आठ मुद्दयांची माहिती | १)अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. २) अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास दि. २१/३/२००९ रोजी मुद्देनिहाय उत्तर दिलेले आहे. |
| ५ | ५५२/ २००९/ सातारा | श्री. आनंदराव नानासो शिंदे मु. बोपेगाव, पो. पांडे, ता.वाई, जि.सातारा | १) ग्रामसेवक, ग्रामपंचायत बोपेगाव २)मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा | विभागीय अप्पर आयुक्त, पुणे विभाग, पुणे | ग्रामपंचायत बोपेगावने केलेला ठराव क्र. ६/११-२-८६ रद्द करणे संदर्भात केलेल्या अपिला बाबतची माहिती | १)अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. २) जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

वरील तक्त्यात नमूद केलेली एकुण पाच अपिले अनुक्रमांक १ व ५ (५१९/ २००९/ सातारा, ५२०/ २००९/ सातारा , ५२१/ २००९/ सातारा, ५४९/ २००९/ सातारा, ५५२/ २००९/ सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २०-०८-२००९

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत:–

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५५४/ सातारा | श्री सत्वशील धैर्यशील शेळके इंद्रप्रस्थ बिल्डींग, शिरवळ रोड, मु.पो.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा | उपविभागीय अधिकारी वाई, उप विभाग वाई, जि.सातारा | अपर जिल्हाधिकारी सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | मौजे लोणंद येथील स.नं.२७९/२अ/१ या जमिनीचा भूसंपादन अधिनियम, १८९४ चे कलम ५२-क प्रमाणे सक्षम अधिकारी यांनी कब्जा घेतला आहे का. यासह एकूण तीन मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याचे अपिलावर पूर्वी अनेकदा सुनावणी घेऊन निर्णय झालेला आहे. सदर अपील दाखल स्तरावर निकाली काढण्यात येत आहे. वारंवार त्याच विषयावर व त्याच मुद्दयांवर अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणांचा वेळ व शक्ती वाया घालवू नये, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. |
| ३ | ५७२/ सातारा | श्री. प्रल्हाद मारुती भिलावे ४८, रघूनाथपूरा पेठ, सातारा | जन माहिती अधिकारी (शहर विकास विभाग), सातारा नगरपरिषद सातारा | मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा | नागरिकांनी वापरलेले सरकारी रस्ते कब्जे हक्काने एखाद्यास देता येतात किंवा नाही यासह एकूण दोन मुद्दयांची खुलासेवजा माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत विहित शुल्क पाठविलेले नाही. तसेच, जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. |
| ४ | ६५२/ सातारा | श्री. बाबुराव श्रीपती मोरे मंगळवार पेठ, फलटण बारामती रोडच्या पश्चिम दिशेला, फलटण जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार फलटण, जि.सातारा | तहसीलदार फलटण, जि.सातारा | मौजे भाडळी खुर्द येथील परडे क्र.४१, ४२, ४३, ४४ मुलकी खात्यातून वन खात्याकडे वर्ग झालेत अगर कसे, तसेच वर्ग झाले | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे. मोजणीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मोजणी विषयक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | असल्यास त्याबाबतचा आदेश व फेरफार इ. बाबतची माहिती. | कार्यवाहीबाबत माहिती जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ३ ही अपीले (अपील क्र.५५४/सातारा, ५७२/सातारा, व ६५२/सातारा ) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपील क्रमांक ६५२/सातारा मध्ये निष्कर्षात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्य कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २८-०८-२००९

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत: –

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५५४/ सातारा | श्री सत्वशील धैर्यशील शेळके इंद्रप्रस्थ बिल्डींग, शिरवळ रोड, मु.पो.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा | उपविभागीय अधिकारी वाई, उप विभाग वाई, जि.सातारा | अपर जिल्हाधिकारी सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | मौजे लोणंद येथील स.नं.२७९/२अ/१ या जमिनीचा भूसंपादन अधिनियम, १८९४ चे कलम ५२-क प्रमाणे सक्षम अधिकारी यांनी कब्जा घेतला आहे का. यासह एकूण तीन मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याचे अपिलावर पूर्वी अनेकदा सुनावणी घेऊन निर्णय झालेला आहे. सदर अपील दाखल स्तरावर निकाली काढण्यात येत आहे. वारंवार त्याच विषयावर व त्याच मुद्दयांवर अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणांचा वेळ व शक्ती वाया घालवू नये, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. |
| ३ | ५७२/ सातारा | श्री. प्रल्हाद मारुती भिलावे ४८, रघूनाथपूरा पेठ, सातारा | जन माहिती अधिकारी (शहर विकास विभाग), सातारा नगरपरिषद सातारा | मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा | नागरिकांनी वापरलेले सरकारी रस्ते कब्जे हक्काने एखाद्यास देता येतात किंवा नाही यासह एकूण दोन मुद्दयांची खुलासेवजा माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत विहित शुल्क पाठविलेले नाही. तसेच, जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. |
| ४ | ६५२/ सातारा | श्री. बाबुराव श्रीपती मोरे मंगळवार पेठ, फलटण बारामती रोडच्या पश्चिम दिशेला, फलटण जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार फलटण, जि.सातारा | तहसीलदार फलटण, जि.सातारा | मौजे भाडळी खुर्द येथील परडे क्र.४१, ४२, ४३, ४४ मुलकी खात्यातून वन खात्याकडे वर्ग झालेत अगर कसे, तसेच वर्ग झाले | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे. मोजणीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मोजणी विषयक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | असल्यास त्याबाबतचा आदेश व फेरफार इ. बाबतची माहिती. | कार्यवाहीबाबत माहिती जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ३ ही अपीले (अपील क्र.५५४/सातारा, ५७२/सातारा, व ६५२/सातारा ) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपील क्रमांक ६५२/सातारा मध्ये निष्कर्षात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्य कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २८-०८-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. ज्ञानदेव धोंडू रावते
रा. स.नं.२७, प्लॉट नं.४१, मुंजाबा वस्ती, — अपीलकर्ता
धानोरी रोड, पुणे-४११ ०१५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र. व्यवस्थापक,
येरवडा कारागृह, मुद्रणालय, पुणे-६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
येरवडा कारागृह, मुद्रणालय, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५५ + ११६४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १२.६.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. ज्ञानदेव धोंडू रावते
रा. स.नं.२७, प्लॉट नं.४१, मुंजाबा वस्ती,
धानोरी रोड, पुणे-४११ ०१५

**जन माहिती अधिकारी**
येरवडा कारागृह, मुद्रणालय, पुणे-६ श्री. अशोक यादवराव दुधगांवकर

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र. ५५५/ पुणे**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे यांनी श्री. गंगाधर नारायण उघडे यांना दि. ९ मार्च २००४ रोजी दिलेल्या चार्जशीटची प्रत, जात पडताळणी समितीने श्री. उघडे यांच्याबाबत दिलेल्या माहे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. ज्ञानदेव धोंडू रावते
रा. स.नं.२७, प्लॉट नं.४१, मुंजाबा वस्ती, — अपीलकर्ता
धानोरी रोड, पुणे-४११ ०१५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र. व्यवस्थापक,
येरवडा कारागृह, मुद्रणालय, पुणे-६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
येरवडा कारागृह, मुद्रणालय, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५५ + ११६४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १२.६.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. ज्ञानदेव धोंडू रावते
रा. स.नं.२७, प्लॉट नं.४१, मुंजाबा वस्ती,
धानोरी रोड, पुणे-४११ ०१५

**जन माहिती अधिकारी**
येरवडा कारागृह, मुद्रणालय, पुणे-६ श्री. अशोक यादवराव दुधगांवकर

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

**अपील क्र. ५५५/ पुणे**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे यांनी श्री. गंगाधर नारायण उघडे यांना दि. ९ मार्च २००४ रोजी दिलेल्या चार्जशीटची प्रत, जात पडताळणी समितीने श्री. उघडे यांच्याबाबत दिलेल्या माहे

ऑक्टोबर १९९० च्या निकालाची प्रत, उच्च न्यायालयाने श्री. उघडे यांच्या पिटिशन मध्ये स्थगिती दिली नसताना व्यवस्थापक, येरवडा कारागृह यांनी चार्जशीटप्रमाणे कारवाई पुढे चालू का ठेवली नाही, याची माहिती, श्री. उघडे यांच्याबाबत जात पडताळणी समितीने दिलेल्या निकालानंतर साडेचौदा वर्षांचा कालावधी गेला त्या विलंबाच्या कारणांची माहिती व इतर अनुषंगिक माहिती

**अपील क्र. ११६४/ पुणे**

आयुक्त, पुणे यांनी दि. ८.११.१९९० च्या समितीच्या निर्णयास दि. २८.२.१९९१ नंतरच्या स्थगिती आदेशाच्या प्रती, दि. २२.१९९२ रोजी अप्पर आयुक्त यांचे समोर झालेल्या सुनावणीच्या निकालाची प्रत व दि. २३.३.१९९२ च्या पत्राची प्रत, श्री. उघडे यांनी स्वतःच्या शाळा सोडल्याच्या मूळ दाखल्यावर खाडाखोड करून 'धनगर' 'ऐवजी' धनवर केलेल्या दाखल्याची प्रत, आयुक्त अमरावती यांनी श्री. उघडे यांच्या अपिलावर दिलेल्या निर्णयाची प्रत, श्री. उघडे यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटिशन क्र.३५३१/०४ च्या मूळ अर्जाची प्रत व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

श्री. गंगाधर नारायण उघडे यांच्या जात पडताळणी व इतर संदर्भातील, तसेच स्वतःच्या पदोन्नतीविषयीची माहिती अपीलकर्ता श्री. ज्ञानदेव धोंडू रावते यांनी दोन स्वतंत्र अर्जांद्वारे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. दि. १०.७.२००६ च्या अर्जावर माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे श्री. अ.या.दुधगावकर यांनी अपुरी दिली व नंतर अपिलीय प्राधिकारी म्हणून त्यांची पदोन्नती झाल्यावर त्या अपिलाची सुनावणी घेण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक यांच्याकडे मागितलेली माहिती चुकीची मिळाल्याच्या कारणावरून आपण केलेले अपील श्री. दुधगांवकर यांनी फेटाळून लावले, या कारणावरून श्री. रावते यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

आयोगाने दि. १२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

श्री. उघडे यांनी अनुसूचित जमातीच्या खोट्या दाखल्यावर नोकरी मिळवून अत्यंत उच्च पदावर पदोन्नती मिळविली, हे वीस वर्षे प्रयत्न करून आपण महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे

सिध्द केले. याच अनुषंगाने माहितीच्या अधिकाराचा कायदा अस्तित्वात आल्यानंतर आपण मागणी केली. परंतु व्यवस्थापनाबाबतचा खोटेपणा बाहेर येऊ नये म्हणून आपल्याला वेळेत, योग्य व बिनचूक माहिती मिळू नये अशी कार्यवाही केली गेली, असे श्री. रावते यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात विस्ताराने मांडले आहे. जन माहिती अधिकारी श्री. नं.शि. सूर्यवंशी व श्री. अ.या.दुधगावकर यांनी या आरोपांचा इन्कार करून श्री. रावते यांना सर्व माहिती दिल्याचे, तसेच संपूर्ण अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून दिल्याचे लेखी व तोंडी नमूद केले.

श्री. रावते यांनी दि. १०.७.२००६ रोजी केलेल्या अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. दुधगांवकर यांनी दि. १०.८.२००६ रोजी काही मुद्दयांची माहिती दिली व तीन मुद्दयांच्या बाबत अपेक्षित असलेल्या अभिलेखाबाबत स्पष्ट अर्थबोध होत नसल्याने अभिलेखाचे अवलोकन करावे, असे पत्र पाठविले. अभिलेखाचे अवलोकन करण्याचा पर्याय न स्वीकारता श्री. रावते यांनी दि. ११.८.२००६ रोजी आपल्याला हव्या असलेल्या कागदपत्रांची यादी जन माहिती अधिकाऱ्यांना दिली. त्यानुसार दि. १२.८.२००६ रोजी श्री. दुधगांवकर यांनी आवश्यक त्या प्रती दिल्या. श्री. दुधगांवकर यांनी तोंडी सांगितल्यावर आपण वेगवेगळे अर्ज केले. आपण नंतर दि. २१.८.२००६ व दि. ४.९.२००६ रोजी अर्ज केले. वेगवेगळे अर्ज करावयास सांगून जाणीवपूर्वक आपल्याला माहिती देण्याचे लांबवले गेले, असे प्रतिपादन श्री. रावते यांनी केले. मात्र श्री. रावते यांचा अर्ज विहित नमुन्यामध्ये नसल्यामुळे त्यांनी विहित नमुन्यात अर्ज करण्यास सांगितले व त्यांनी अर्ज केल्यानंतर तातडीने त्यांना माहिती दिली, असे प्रतिपादन श्री. दुधगांवकर यांनी केले. त्याबाबतचा तपशील त्यांनी पूरक कागदपत्रांसह सादर केला.

अन्य अपिलात, दि. १०.६.२००७ रोजी श्री. रावते यांनी मागितलेली माहिती शुल्क भरल्यानंतर दि. ८.८.२००७ रोजी त्यांना देण्यात आली. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी श्री. सूर्यवंशी यांनी माहिती पूर्ण व मुदतीत दिली असल्याचा निष्कर्ष काढून अपिलीय प्राधिकारी श्री. दुधगांवकर यांनी अपील निकाली काढले. पदोन्नतीबाबत आपल्यावर व्यवस्थापनाने सातत्याने अन्याय केला असून श्री. दुधगांवकर यांनी जाणीवपूर्वक माहिती देणे टाळले आहे, असा आरोप श्री. रावते यांनी आयोगाला सादर केलेल्या विविध निवेदनांमध्ये केला आहे. पदोन्नती व त्या अनुषंगाने येरवडा कारागृह व्यवस्थापनाने केलेल्या कार्यवाहीची योग्या-योग्यता हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. अभिलेखाचे अवलोकन करण्यास सांगण्याची कायद्यात तरतूद नाही, असा आक्षेप श्री. रावते यांनी घेतला

आहे. तसेच अवलोकनाच्या वेळेला काही कागदपत्रे दडवून ठेवण्यात आली व माहितीच्या अधिकारात मागणी केल्यानंतर ती आपल्याला मिळाली, असे श्री. रावते यांनी म्हटले आहे. परंतु त्याचा कोणताही पुरावा आयोगापुढे आलेला नाही. त्यांनी केलेल्या अर्जानुसार विहित मुदतीत माहिती देण्यात आली आहे. तसेच अभिलेखाचे अवलोकन करावयास सांगणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार वैध आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मोहन कृष्णा गोडसे (माळी)
महर्षीनगर, मु.पो.माळीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी,
टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गावकामगार तलाठी,
तलाठी कार्यालय, वेणेगाव(टेंभुर्णी), ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६५ / सोलापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मोहन कृष्णा गोडसे (माळी)
महर्षीनगर, मु.पो.माळीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी,
टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.डी.एन.लोंढे

**जन माहिती अधिकारी** तथा गावकामगार तलाठी,
तलाठी कार्यालय, वेणेगाव(टेंभुर्णी), ता.माढा, जि.सोलापूर श्री.डी.डी.गुठाळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>भूसंपादन क्र.५७, तांबवे श्री.देवू जया गोडसे(माळी) व लक्ष्मण जयाप्पा गोडसे (माळी) यांनी खरेदी केल्यापासून आजअखेर वारसा हक्काच्या फेरफार नोंदीचे (६ ड) व ७/१२ उतारे. | |

## विवेचन

आपल्या अर्जाप्रमाणे नोंद करुन घेतलेली वारसांची नावे बदलून खोट्या नोंदी केल्या. या जमिनीच्या फेरफार नोंदीची व ७/१२ उताऱ्याची मागणी आपण जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. गाव कामगार तलाठी; वेणेगाव (टेंभुर्णी); ता.माढा, जि.सोलापूर श्री.डी.डी.गुठाळ, मंडल अधिकारी, टेंभुर्णी श्री.डी.एन.लोंढे व माढा तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षाचे कक्ष अधिकारी श्री.महावीर तिवारी यांनी वारसा हक्काच्या नोंदीचे फेरफार आपल्यापासून लपविले आहेत. म्हणून त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.मोहन कृष्णा गोडसे (माळी) यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

दि.१९.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

महसूल खात्याच्या वर्षाअखेरीमुळे व कामाच्या व्यापामुळे माहिती देणेस विलंब झाला. श्री.गोडसे यांनी मागणी केलेले फेरफार आपल्याकडे नसल्यामुळे आपण देणे शक्य नव्हते, असे श्री.गुठाळ यांनी प्रपत्रात व आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. श्री.गोडसे यांनी योग्य त्या कार्यालयाकडे माहिती-मागणीचा अर्ज व अपील केले नव्हते, त्यामुळे त्या त्या अधिकाऱ्यांकडे

अर्ज व अपील पाठविण्यात वेळ गेला व उपलब्ध माहिती देण्यात आली होती, असे श्री.लोंढे यांनी नमूद केले. ऊर्वरित माहिती अभिलेख कक्षात शोध घेऊन निःशुल्क पाठविण्याचे त्यांनी मान्य केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी माढा तहसील कार्यालयाच्या शाखेतून संबंधित उतारे प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास द्यावेत, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. वास्तविक हे उतारे अभिलेख शाखेकडे जमा केले असल्याचे श्री.गोडसे यांना पूर्वीच कळविले होते, तरीही केवळ आपल्याला त्रास देण्यासाठी त्यांनी आपल्याविरुध्द अपील केले. आयोगाच्या आदेशानुसार दि.२१.६.२००८ रोजी रजिस्टर्ड टपालाने उताऱ्याच्या प्रती आपण स्वखर्चाने पाठविल्या आहेत, असे श्री.गुठाळ यांनी दि.२३.६.२००८ च्या पत्रान्वये आयोगास संबंधित पत्राच्या प्रतीसह अवगत केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**पुणे**
**दि३१.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५७६/ २००९ / पुणे | श्री. गोविंद लक्ष्मण बनसोडे विभागीय सचिव, कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटना, राज्य परिवहन, विभागीय भांडार, दापोडी, पुणे-१२ | जन माहिती अधिकारी तथा कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | दि.१५.१.२००९ रोजीचे अर्जात मागणी केल्याप्रमाणे कु. मनिषा खोपडे यांची बारामती येथून विभागीय भांडार, दापोडी, पुणे येथे केलेल्या बदली संदर्भातील पत्रव्यवहाराबाबत | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्र जोडलेली नाहीत. |
| २ | ५७७/ २००९ /पुणे | श्री. दिपक सेठी ६०२, जाकरंदा न्याती इस्टेट, महमदवाडी, हडपसर, पुणे-२८ | माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रास्ता पेठ, पुणे-११ | अपिलीय प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रास्ता पेठ, पुणे-११ | २२ के.व्ही. स्विचगिअर्स बसविणे संदर्भातील विलंबाबाबतचा खुलासा | स्विचगिअर्स साठीची ऑर्डर देण्याचे अधिकार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास नसल्याने माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती उपलब्ध करून देता येणार नाही, हे जन माहिती अधिकारी यांचे दि. २०.६.२००९ रोजीचे उत्तर योग्य आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ५९९/ २००९ /पुणे | श्री. दत्तात्रय कोंडाजी काळे रा. चासकमान, ता.खेड, जि.पुणे | माहिती अधिकारी, तहसील कार्यालय राहुरी, जि. अहमदनगर | अपिलीय प्राधिकारी, तहसील कार्यालय राहुरी, जि. अहमदनगर | खंडाबे बु.येथील शेतजमीन स.नं.१२५ /२ चे रजिस्टर्ड खरेदीखत असताना त्या खरेदी खताची नावे स.नं.१२५/१ चे क्षेत्रावर मालक म्हणून लावली यासंबंधीची माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्र जोडलेली नाहीत. |
| ४ | ६००/ २००९ /पुणे | श्री. चुनिलाल बाफना टी/३८३, आदिनाथ सोसायटी, पुणे सातारा महामार्ग, पुणे-६७ | माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर | अपिलीय प्राधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर | मौजे सुपे, ता.पारनेर येथील जमीनी गट नं.३६५ ते ३६८ प्रमाणे गट नं.२७१ ते २७६ पैकी १०१ आर क्षेत्र पाझर तलावासाठी संपादन केले त्याची नुकसान भरपाई मिळणेबाबत | अपिलीय प्राधिकारी यांचा दि.१५.१२. २००७ रोजीचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ५ | ७३८/ २००९ /पुणे | श्री. विनोद चटप २९, परदेशी चाळ, चिंचवडे नगर, चिंचवड गाव, पुणे-३३ | माहिती अधिकारी, तहसील कार्यालय किल्ले धारूर, ता. किल्ले धारूर, जि. बीड | अपिलीय प्राधिकारी, तहसील कार्यालय किल्ले धारुर जि. बीड | तांदळवाडी गट नं.२६१ या सरकारी गायरान जमिनीवर काही पारधी व मातंग समाजाच्या लोकांनी अतिक्रमणे केली आहेत, त्याबाबत कार्यवाही करावी. व तद्संबंधी माहिती द्यावी. | अपीलकर्त्याने मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. २. तथापि सदर विषयाबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ८ दिवसांत द्यावी. |
| ६ | ६०१/ २००९ /पुणे | श्री. अतुल आर. पवार प्लॉट नं.१२, दुसरा मजला, मित्तल अपार्टमेंट, | व्यवस्थापक, अहमदनगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को.ऑप. क्रेडिट सो. | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, स्टेशन रोड, अहमदनगर | चेअरमन, व्हाईस चेअरमनसह सर्व संचालक मंडळाची माहिती मिळणेबाबत | मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णया नुसार नागरी सहकारी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | साईनगर, महानगर बँकेमागे, चंदननगर, पुणे | लि., अहमदनगर | | | बँकाना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तथापि नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याकडे उपलब्ध असेल ती अर्जदारास देणे बंधनकारक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१ वरील तक्त्यातील एकूण ६ अपिले अनुक्रमांक १ ते ६ ( अपील क्र. ५७६/२००९/पुणे, ५७७/२००९/पुणे, ५९९/२००९/पुणे, ६००/२००९/पुणे, ६०१/२००९/पुणे व ७३८/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ७३८/२००९/पुणे मधील जन माहिती अधिकारी यांनी सद्यस्थितीबाबतची माहिती अपीलकर्त्याला ८ दिवसांत देऊन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**

**दि. ११.८.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ०५-०५-२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५८१/ सातारा | श्री. रणजितसिंह विनायकराव दुधे मु.पो. कडेगाव, ता.वाई, जि. सातारा | निवासी नायब तहसीलदार वाई, ता.वाई, जि.सातारा | तहसीलदार वाई, ता.वाई, जि.सातारा | तहसीलदार वाई यांच्या कार्यालयाची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ नुसार माहिती व शासन निर्णयानुसार कर्मचा-यांच्या बदलीबाबत केलेल्या शिफारशीच्या प्रती | जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास १५ दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ६०३/ सातारा | श्री. जयवंत गजानन कुलकर्णी (भिंगारे), मु.पो.ओगलेवाडी, ता.कराड, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार कराड, ता.कराड, जि.सातारा | तहसीलदार कराड, ता.कराड, जि.सातारा | अपीलकर्त्याच्या नावे मौजे रेठरे बुद्रुक, ता.कराड, जि.सातारा येथील पिंपळाईदेवी देवस्थान इनाम वर्ग-३ या जमिनीचे सन १९४८ ते आजपर्यंतचे ७/१२ व फेरफार उतारे व इतर १२ मुद्दे | अपीलकर्त्यास माहिती न मिळालेल्या दोन मुद्दयांची तयार केलेली माहिती दिनांक ११.०५.०९ रोजी समक्ष घेण्याचे अपीलकर्त्यास मान्य असल्याचे त्यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ६०४/ सातारा | श्री. विजय निवृत्ती पाटील मु.पो.काले (बाजारपेठ दत्त मंदिरा जवळ), ता.कराड, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार कराड, ता.कराड, जि.सातारा | तहसीलदार कराड, ता.कराड, जि.सातारा | दि इस्लामपूर अर्बन को-ऑप. बँक लि. इस्लामपूर विरुध्द केलेल्या तक्रार अर्जाच्या प्रती व त्या संदर्भातील पत्र-व्यवहाराच्या प्रती | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाच्या दिवशी दि.५/५/०९ रोजी सर्व माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ६०८/ सातारा | श्री. शब्बीर महंमद हनिफ मुल्ला ४०७, शनिवार पेठ, कराड, ता.कराड, जि.सातारा | उप विभागीय पोलीस अधिकारी, कराड उप विभाग, कराड, जि.सातारा | अप्पर पोलीस अधिक्षक सातारा, जि. सातारा | कराड मधील मुस्लिम कब्रस्थानातील घाण, कचरा उचलणे, जुन्या ऐतिहासिक कबरींची स्वच्छता करणे, चुना मारणे तसेच मोडतोड झालेल्या कबरींची दुरुस्ती करणे अथवा डागडुजी करणेस कोणत्या संघटनेचा/संस्थेचा अथवा वैयक्तिक विरोध असल्यास त्याबाबत लेखी माहिती द्यावी किंवा याबाबत शासनाचे आदेश/अध्यादेश असल्यास त्याची प्रत | माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ४ ची अपीले (अपील क्र.५८१/सातारा, ६०३/सातारा, ६०४/सातारा, व ६०८/सातारा ) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपील क्र.५८१/सातारा व ५०३/सातारा प्रकरणी विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत नमूद केले आहे, त्यानुसार पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवडयात अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-०८-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीप भगवान सोनवर
पटेल चौक, कुर्डुवाडी, ता.माढा,जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन )
नगरपालिका प्रशासन, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, कुर्डुवाडी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८३ + ६०३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १८.६.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दिलीप भगवान सोनवर
पटेल चौक, कुर्डुवाडी, ता.माढा,जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्तं (सामान्य प्रशासन )
नगरपालिका प्रशासन, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. अ.रे.वेणेगुरकर

**जन माहिती अधिकारी** मुख्याध्यापिका,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, कुर्डुवाडी, जि.सोलापूर
सौ. रे.र. कुलकर्णी

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र. ५८३**

प्रशालेकडे गरीब विद्यार्थी कल्याण निधी कोणत्या सालापासून घेण्यास सुरुवात झाली, गरीब विद्यार्थी कल्याण निधी घेण्यासाठी कोणत्या समितीची मंजुरी घेतली त्या समितीचे नाव व त्या ठरावाची सत्य प्रत व इतर अनुषंगिक १३ मुद्दयांची माहिती

**अपील क्र. ६०३**

सन २००६-०७ मध्ये महात्मा फुले उच्च माध्यमिक प्रशालेकडे कु. दिपाली दिलीप सोनवर हिला इ. ११ वी सायन्ससाठी प्रवेश देत असताना एकूण रक्कम रू.२२५/- घेण्यात आले, परंतु पावती मात्र रू.२५/- ची देण्यात आली, ऊर्वरित रक्कम रू.२००/- कशासाठी घेतले याची सविस्तर माहिती, सन २००६-२००७ मध्ये इ. ११ वी मध्ये प्रवेश देत असताना रू.२२५/- एवढी फी किती विद्यार्थ्यांकडून घेण्यात आली व अशी एकूण किती फी जमा झाली याबाबत व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

आपल्या मुलाला प्रवेश देताना घेतलेले शुल्क व त्या अनुषंगाने शुल्कविषयक नियमांबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. दिलीप भगवान सोनवर यांनी मागितली होती. त्रोटक व अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरून सविस्तर माहिती मागण्यासाठी श्री. सोनवर यांनी दुसरा अर्ज केला. या दोन्ही अर्जांच्या संदर्भात श्री. सोनवर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

आयोगाने दि. १८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता.

दि. ५.३.२००७ या मूळ अर्जातील माहिती आपल्याला मिळाली. परंतु सविस्तर माहिती मिळावी यासाठी आपण अपील केले असल्याचे अपीलकर्ता श्री. सोनवर यांनी प्रपत्रात नमूद केले, तर माहिती विस्तृत होती, काही माहिती त्वरित दिली व ऊर्वरित माहिती रजिस्टर्ड टपालाने पाठविली. ती अपीलकर्त्याने स्वीकारलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला कुर्डूवाडी सौ. रे.र. कुलकर्णी यांनी नमूद केले. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

**अपील क्र. ६०३ -** माहिती अपुरी मिळाल्याच्या कारणावरून श्री. सोनवर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, ( सामान्य प्रशासन ) नगरपालिका प्रशासन, पुणे यांच्याकडे केलेले अपील त्यांनी फेटाळले. तसेच

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशालेने संबंधित शैक्षणिक कार्यवाहीसाठी मान्यता मिळण्यासाठी नगर पालिका प्रशासनाकडे प्रस्ताव सादर करावा, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानुसार उच्च माध्यमिक प्रशालेचा प्रस्ताव नगरपालिका संचालनालयामार्फत मुंबई कार्यालयाकडे पाठविण्याची छाननी चालू आहे, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य सौ. रे.र. कुलकर्णी व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, ( सामान्य प्रशासन ) नगरपालिका प्रशासन, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. अ.रे. वेणेगुरकर यांनी प्रपत्रात नमूद केले.

श्री. सोनवर यांना माहिती देण्यात आली असून आणखी काही माहिती हवी असल्यास ती देण्यास आपण तयार असल्याचे प्राचार्य सौ. रे.र.कुलकर्णी यांनी सांगितले. तसेच अपीलकर्त्यास अपेक्षित असलेल्या सविस्तर माहितीबाबत अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कुर्डुवाडी यांनी अन्य अर्जावरील प्रथम अपिलाच्या सुनावणीत दखल घेऊन कार्यवाहीचा अहवाल आयोगाला सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार मुख्याधिकारी, नगर परिषद, कुर्डुवाडी यांनी दि. २१.७.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेऊन, पूर्वी दिलेल्या माहितीतील दोन मुद्दयांची विस्तृत स्वरूपात माहिती दि. २.८.२००८ पर्यंत श्री. सोनवर यांना देण्याचे आदेश दिले व त्यानुसार दि. १५.७.२००८ रोजी माहिती देण्यात आली, असे माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला यांनी श्री.सोनवर यांना दिलेल्या माहितीच्या प्रतीसह दि. ३०.७.२००८ रोजी आयोगाला सादर केले.

श्री. सोनवर यांच्या मूळ अर्जातील काही मुद्दे भाष्य अथवा खुलासा याची मागणी करणारे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशी विचारणा करता येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्या समोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
कौंसिल हॉल समोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत:-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६२५/ कोल्हापूर | श्री. सदानंद तुकाराम आमते रा.कोथळी, ता.करवीर, जि.कोल्हापूर. | सेक्रेटरी, श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कोथळी, ता.करवीर, जि.कोल्हापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, करवीर, जि.कोल्हापूर. | अपीलकर्त्याच्या नावे असणा-या दामदुप्पट ठेवीचा पूर्ण खाते उतारा व इतर चार मुद्दे. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ सहकारी संस्थांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ मध्ये दिला आहे. त्यानुसार सदर अपील दखल घेण्यायोग्य ठरत नाही. |
| २ | ६५८/ कोल्हापूर | श्री. जगन्नाथ मारुती संकपाळ मु.पो.माले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | माहिती अधिकारी ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) कोल्हापूर जिल्हा परिषद, जि.कोल्हापूर | कर आकारणी कमी करणेबाबतची माहिती. | अपीलकर्त्याची मागणी ही कर आकारणी कमी करणे बाबतची आहे. सदरची बाब ही प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. |
| ३ | ६५९/ कोल्हापूर | श्री. संपत पांडुरंग आबदार ३८१, 'अवधूत' जय भवानी कॉलनी, रिंग रोड, फुलेवाडी, कोल्हापूर. | उप अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग क्र.२३, ताराबाई पार्क, कोल्हापूर. | कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.०७, ताराबाई पार्क, कोल्हापूर. | रत्नागिरी-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.२०४ कि.मी.७३/५१५ जक १३७/० रस्त्याच्या कामाबाबत. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाही. |
| ४ | ६६०/ कोल्हापूर | श्री. राजाराम शंकर कणसे रा. घर नं.०३ भोसलेवाडी, ई-वॉर्ड, कोल्हापूर | जल अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर. | उप-आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | ड्रेनेजच्या पाण्यामुळे झालेल्या शेतीचे नुकसानबाबतची माहिती. | अपीलकर्त्यान अपिलासोबत आवश्यक मुद्रांक शुल्क जोडलेले नाही. |
| ५ | ६६१/ कोल्हापूर | श्री. संदीप मारुतीराव कोरगांवकर | उपविभागीय पोलीस अधिकारी, करवीर विभाग, | जिल्हा पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक यांचे | दिनांक ०८.०१.२००९, दिनांक १७.०१.२००९ व दिनांक | अपील अर्ज परिपूर्ण नाही. तसेच, अपिलासोबत आवश्यक मुद्रांक शुल्क |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रा.४८/१०, शांतीनगर, उचगांव पूर्व, मु.पो.उचगांव, ता.करवीर, जि.कोल्हापूर. | सोन्या मारुती चौक, कोल्हापूर. | कार्यालय, कोल्हापूर | २९.०१.२००९ रोजी केलेल्या अर्जाच्या तसेच जाबजबाबाच्या संबंधातील माहिती. | जोडलेले नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्रमांक. ६२५/कोल्हापूर, ६५८/कोल्हापूर, ६५९/कोल्हापूर, ६६०/कोल्हापूर, व ६६१/कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१-०८-२००९**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहिती (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६३३ व ६३४/ कोल्हापूर | श्री. जवाहरलाल आप्पासाहेब रोटे ६४४-ई, १ली गल्ली, शाहूपूरी, कोल्हापूर | शाखाधिकारी, श्री शिवाजी सहकारी बँक लिमिटेड गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर | मुदत ठेव रक्कमेबाबतची माहिती | मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. तथापी नियंत्रक अधिकारी म्हणून नागरी सहकारी बँकांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे ती त्या कार्यालयाने देणे बंधनकारक आहे. |
| २ | ९२२/ २००९/ कोल्हापूर | श्रीमती पद्मावती वसंतराव फाटक १०७, 'वसंतपद्म' बटुकेश्वर कॉलनी, शिंगणापूर रोड, चंबुखडी, कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर यांचे कार्यालय, कोल्हापूर | उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर | श्री सिध्द बटुकेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्थापनेपासून १९८७ ते सद्यस्थिती पर्यंतची एकूण सात मुद्दयांची माहिती | उपलब्ध कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याने प्रथम अपील केलेले दिसून येत नाही, ते करण्यात यावे. |
| ३ | ९२३/ २००९/ कोल्हापूर | श्री. संभाजी कृष्णा कापसे मु.पो.नरेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | सहायक निबंधक सहकारी संस्था, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर | ग.क्र.११४२ या शेतीचे पाणी कोणत्या नियमाखाली बंद करण्यात आले त्याची छायांकित सत्यप्रत यासह एकूण १२ मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने विविध माहितीमागणी अर्जांच्या अनुषंगाने आयोगाकडे एकच अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ३ वरिल एकूण ४ अपिले (क्र. ६३३ व ६३४/कोल्हापूर, ९२२/२००९/कोल्हापूर व ९२३/२००९/कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८-०८-२००९**